आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे मोरवा विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी १७ कोटींची मान्यता

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या मागणीला मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिली मंजुरी

मोरवा विमानतळ आधुनिकीकरण आणि सुरक्षाविषयक सुविधा उभारणीचा मार्ग मोकळा

चंद्रपूर, दि.०३- राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा विमानतळाच्या आधुनिकीकरण, सुरक्षाविषयक सुविधांच्या उभारणी आणि नूतनीकरणासाठी आवश्यक असलेला ₹१७ कोटी रुपयांचा निधी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी तत्काळ मंजूर केला आहे. आज विधानभवनातील मुख्यमंत्री कार्यालयात झालेल्या भेटीत आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी विमानतळाच्या सुरक्षाविषयक अडचणी आणि उडान क्लबच्या प्रशिक्षणासाठी आवश्यक सुविधांबाबत सविस्तर माहिती देत निधीची मागणी केली. आ.मुनगंटीवार यांच्या आग्रही मागणीला प्रतिसाद देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्वरित मंजुरी दर्शवली आहे.

मोरवा विमानतळ परिसरात वैमानिक प्रशिक्षण संस्था म्हणून नागपूर उडान क्लब, भारत सरकारच्या नागरी विमान संचालनालयाच्या (DGCA) मान्यतेनुसार कार्यरत आहे. या ठिकाणी सुरक्षित, आधुनिक आणि नियमांनुसार विमान संचालनासाठी सुरक्षाविषयक व मूलभूत सुविधांची उभारणी अनिवार्य आहे. यासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण कामांबाबत आज आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन सादर केले.

DGCA च्या नियमांनुसार पुढील अत्यावश्यक सुविधांची उभारणी आवश्यक असून परिमिती तपासणी मार्गाचे बांधकाम,विमानतळाभोवती उपलब्ध संरक्षण भिंतीची उंची वाढविणे, हॅंगर व फ्युएल स्टोरेजपर्यंत जाण्यासाठी सुरक्षित संपर्क मार्ग,विमानतळाच्या चारही दिशांना सुरक्षा देखरेख टॉवरचे बांधकाम,मुख्य इमारतीसमोरील भागात हाय-मास्ट प्रकाशयोजना,स्वागत द्वार, गार्ड रूम, पार्किंग व्यवस्था आणि रेस्ट हाऊस उभारणी या सर्व कामांसाठी एकूण ₹१७ कोटी निधीची मागणी केली. विमान सुरक्षेचे महत्त्व आणि उडान क्लबच्या प्रशिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असलेली कामे तातडीची असल्याचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या प्रस्तावाला संपूर्ण सकारात्मकता दाखवत ₹१७ कोटींच्या निधीस त्वरित मंजूरी दिली.

मोरवा विमानतळाचे आधुनिकीकरण, विस्तारीकरण आणि सुरक्षा मजबूत करण्याच्या या निर्णयामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील विमान प्रशिक्षण आणि विमानचालन क्षेत्राला नवे बळ मिळेल, असे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद करत मुख्यमंत्री महोदयांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा

# सुधीर मुनगंटीवार

विधानसभा सदस्य, बल्लारपूर, जि. चंद्रपूर

7722074199
Sudhir.Mungantiwar
sudhir.mungantiwar
www.sudhirmungantiwar.com
@SMungantiwar.com
SudhirMungantiwar
sudhirbhau.mungantiwar@gmail.com
bjp03069@gmail.com

जावक क्रमांक : 9186 / [illegible] / 25 दिनांक : 01.12.2025

प्रति,

मा. ना.श्री. देवेन्द्रजी फडणविस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन,
मंत्रालय, मुंबई -32

MD MADC

वंदे मातरम् !

विषय : मोरवा विमानतळ, चंद्रपूर येथे नागपूर उड्डाण क्लबकरीता आवश्यक मुलभुत सुविधा व सुरक्षा विषयक कामकाज करण्याबाबत.

संदर्भ : माझे आपणास सादर पत्र दिनांक 19.11.2025

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा विमानतळ परिसरात वैमानिक प्रशिक्षण संस्था म्हणुन नागपूर उड्डाण क्लब हे भारत सरकारच्या नागरी विमानन संचालनालय (डि.जी.सी.ए.) यांच्या मान्यतेनुसार कार्यरत असुन विमानांच्या सुरक्षीत संचालनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक आहे. त्यादृष्टीने खालील कामे त्वरीत करणे गरजेचे आहे.

1. नागरी विमानन संचालनालयाने घालुन दिलेल्या सुरक्षेच्या नियमांचे पालन करून परिमिती तपासणी मार्ग (**Boundary Inspection / Periphery Road**) चे बांधकाम करणे.
2. वन्यजिव विमानतळ परिसरात प्रवेश करू नये याकरीता विमानतळाच्या संपुर्ण क्षेत्राभोवती उपलब्ध असलेल्या संरक्षण भिंतीची उंची वाढविण्यात यावी.
3. विमानतळावर प्रस्तावित हँगर व **Fuel Storage** ला जाण्यासाठी सुलभ व सुरक्षीत संपर्क मार्ग (**Approach Road**) चे बांधकाम करणे.
4. विमानतळाच्या चारही दिशेला सतत व प्रभावी देखरेखीकरीता सुरक्षेच्या नियमांनुसार चार वॉच टॉवर्सचे बांधकाम करणे.
5. सद्यस्थितीत विमानतळाच्या मुख्य इमारतीच्या समोरील भागात पुरेशी प्रकाश व्यवस्था नसुन सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन टर्मिनल इमारतीच्या परिसरात **High Mast** लाईट लावण्यात यावा.
6. मोरवा विमानतळ चंद्रपूर उड्डाण क्लब करीता स्वागत गेट, गार्ड रूम, पार्कींग सुविधा, उर्वरीत ॲपरान, पायलट रेस्टहाऊस व इतर संकीर्ण बाबी.

वरील बाब क्र. 1 ते 6 च्या बांधकामाच्या दृष्टीने रू.17.00 कोटी निधीची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने उक्त कामांकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबतच्या योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

1 मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्षा, नागपूर उड्डाण क्लब, नागपूर
2 मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
3 मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1, चंद्रपूर